# डॉ. श्रीधर दत्तात्रय नातू यांचे शैक्षणिक कार्य - संदर्भ रत्नागिरी जिल्हा

**प्रा.प्रमोद अरविंद देसाई**
पाटपन्हाळे कला वाणिज्य व विज्ञान महाविद्यालय.
तालूका - गुहागर, जिल्हा - रत्नागिरी
408prabhat@gmail.com

**डॉ.सर्जेराव आर. शिंदे**
कुलसचिव,
स्वामी रामानंद तिर्थ मराठवाडा विद्यापिठ,
नांदेड.

**गोषवारा**

आज पासून सुमारे ५० ते ६० वर्षापूर्वी रत्नागिरी जिल्हयाच्या काही भागात प्राथमीक तर काही मोजक्याच ठिकाणी माध्यमीक शिक्षणापर्यंतच्या सुविधा होत्या.याचा लाभ केवळ त्याच गावासभोवतालच्या जनतेला होत होता.त्याकाळात रस्ते व प्रवासाची साधने अत्यंत मर्यादीत होती.बेताची आर्थिक परिस्थीती व शैक्षणीक सुविधांचा आभाव यामुळे सर्वसामान्यांसाठी शिक्षण ही एक अत्यंत दुर्लभ अशी बाब होती.त्यामुळे गोरगरीबांची मुले शिक्षणाशिवाय अशिक्षीतच रहात होती.येथील तरूण मुलांपुढे एकतर थोडी फार असलेली वडीलोपार्जीत शेती करणे अन्यथा आपले नातेवाईक किंवा ओळखीच्या व्यक्तीच्या आश्रयाने मुंबईला राहून मीळेल ती नोकरी करणे हाच उपजिवीकेचा व अर्थार्जनाचा मार्ग होता. डॉ श्रीधर तथा तात्यासाहेब नातूयांना रत्नागिरी जिल्हयातील एक अलौकीक व्यक्तीमत्व म्हणून ओळखले जाते. आपल्या सामाजीक जिवनाची सुरूवात त्यांनी वैद्यकीय व्यवसायाने केली व पुढील काळात त्यांनी रत्नागिरी जिल्हयातील गुहागर विधानसभा मतदार संघाचे आमदार म्हणून काम केले.त्यांनीआपल्या भागाची ही परीस्थीती लक्षात घेऊन येथील येथील तरूणवर्ग शिकला तरच या प्रतिकुल परिस्थीतीवर मात करू शकेल व या भागाचा कायापालट होऊ शकेल यादृष्टीने प्रामुख्याने येथील शैक्षणिक विकासावर भर दिला. त्यांनी अथक व कठोर परिश्रमातून आणि स्वताःच्या पैसा खर्च करून जिल्हयाच्या परीसरातील अनेक दुर्गम गावांमध्ये शिक्षणसंस्था स्थापन केल्या.आजपर्यंत आपण अनेक उदाहरणे पहात आलो आहोत की बहुतांशी शिक्षणसंस्थांची स्थापना सुरूवातीला शिक्षणप्रसाराच्या हेतुने झाली असती तरी अंतर्गत मात्र त्यातुन आर्थिक लाभ मिळवणे हाच छुपा हेतू साधला जातो.डॉ श्रीधर नातू यांनी मात्र आपल्या संपूर्ण जिवनभरात केवळ सर्वसामान्य जनतेला शिक्षणाची सुविधा उपलब्ध करून देणे हाच उदात्त विचार नजरेसमोर ठेऊन रत्नागिरी जिल्हयातील आपले विधानसभेचे कार्यक्षेत्र असलेल्या गुहागर व चिपळूण तालुक्याच्या पुर्णपणे ग्रामीण, डोंगराळ व मागास असलेल्या भागात शिक्षणसंस्था स्थापन केल्या व त्या सर्व यशस्वीपणे चालवील्या.या शिक्षणसंस्थांना सरकारी अनुदान मिळेपर्यंत पदरमोड सहन करून सर्व शिक्षणसंस्था चालविल्या.याहुनही अत्यंत विशेष अशी बाब म्हणजे या सर्व शिक्षणसंस्थांना सरकारी अनुदान मिळाल्यावर आपला अधिकारात न ठेवता त्या त्या गावच्या सक्षम लोकांची समीती स्थापन करून व होतकरू अध्यक्ष व सदस्य निवडून या शिक्षणसंस्था त्या त्या गावांकडे सुपुर्द केल्या.यापेक्षा निस्वार्थ लोकसेवा आणखी काय असू शकते. डॉ श्रीधर नातू यांनी केलेल्या या शैक्षणिक कार्याचा व त्यातून उंचावलेल्या शैक्षणिक परिस्थीतीचा आढावा घेण्याचा प्रयत्न या शोधनिबंधाच्या माध्यमातून केला आहे.

**शोधनिबंधाची आवश्यकता:-**

देशाच्या विकासामध्ये तेथील शासन, प्रशासन पध्दतीची रचना व कार्यपध्दतीला जेवढे महत्व असते तेवढेच त्या देशाला लाभणारे नेतृत्व सुध्दा महत्वाचे असते.आपल्या देशाला सुदैवाने केंद, राज्य आणि स्थानीक अशा सर्व पातळीवर चांगल्या प्रकारचे नेतृत्व लाभले आहे.देशाने केलेल्या प्रगतीचा आढावा घेताना या नेत्यांनी केलेल्या कार्याचा, त्यांनी राबविलेल्या धोरणांचा, त्यांच्या दूरदृष्टीचा अभ्यास करणे महत्वाचे ठरते.या नेत्यांच्या

कार्याचे संशोधन करूनच भविष्यातील नेतत्वाला आपली वाटचाल यशस्वीपणे करणे शक्य होते.याशोधनिबंधाच्या माध्यमातून डॉ.श्रीधर नातू यांनी जनतेचे शैक्षणिक जिवनमान उंचावण्यासाठी केलेल्या कार्याचा आढावा घेण्याचा प्रयत्न केला आहे.

**शोधनिबंधाची उद्दिष्टये –**

१. रत्नागिरी जिल्हयाच्या शैक्षणिक परिस्थीतीचा आढावा घेणे.
२. डॉ.श्रीधर तथा तात्यासाहेब नातु यांच्या व्यक्तीमत्वाचा व विचारांचा परीचय करून घेणे.
३. डॉ.श्रीधर नातू यांनी केलेल्या शैक्षणिक कार्याचा आढावा घेणे.
४. डॉ.श्रीधर नातू यांनी केलेल्या शैक्षणिक कार्यामुळे बदललेल्या परिस्थीतीचेविश्लेषण करणे.
५. डॉ.श्रीधर नातू यांनी केलेल्या शैक्षणिक कार्यामुळे नविन नेतृत्वाला कशाप्रकारे लाभ होऊ शकेल याचे अध्ययन करणे.

**प्रस्तावना –**

एखाद्या प्रदेशाचा सर्वांगीण विकासाचा विकास हा प्रामुख्याने तेथील शैक्षणीक विकासावर अवलंबून असतो.शिक्षण हा जनतेच्या विकासाचा मुख्य पाया असतो आणि तोच त्या प्रदेशातील सामाजीक परिवर्तनाचे मुख्य साधन असतो.रत्नागिरी जिल्हयामध्ये लोकमान्य टिळक (जन्म २३ जुलै १८५६ जन्मस्थळ – चिखली, तालुका – दापोली, जिल्हा – रत्नागिरी) डॉ. बाबासाहेब आंबेडकर (जन्म ११ एप्रिल १८९१ गाव – आंबवडे तालुका – गुहागर, जिल्हा – रत्नागिरी) गोपाळ कृष्ण गोखले (जन्म ०९ मे १८६६ जन्मस्थळ – कोतळूक, तालुका – गुहागर, जिल्हा – रत्नागिरी) इत्यादी सारखे अनेक ज्ञानवंत व नामवंत व्यक्ती जन्माला आल्या ज्यांनी आपल्या देशाच्या स्वांतज्या बरोबरच देशाच्या, महाराष्ट्राच्या शैक्षणीक विकासामध्ये मोलाची भुमीका बजावलीआहे.(http://mr.m.wikipedia.org) त्यांची जन्मभुमी जरी रत्नागिरी जिल्हयातील असली तरी कर्मभुमी मात्र स्वातंज्य चळवळीचे व शिक्षणाचे कार्यक्षेत्र असलेल्या मुंबई, पुणे इत्यादी शहारांमध्ये होती.त्यांच्या कार्याच्या व विचारांच्या प्रभावतुन रत्नागिरी जिल्हयाच्या परिसरात सन १९०२ पटवर्धन हायस्कूल रत्नागिरी, १९४८ शिर्के हायस्कूल रत्नागिरी, १९४५ गोगटे जोगळेकर महाविद्यालय रत्नागिरी अशा काही शैक्षणीक संस्था निर्माण झाल्या असल्या तरी आजच्या रत्नागिरी जिल्हयाचा त्याकाळातील परिसर व लोकसंख्या यांच्या तुलनेत त्यांची संख्या खूपच नगन्य अशीच होती. आज येथे शैक्षणीक संस्थांची संख्या काही प्रमाणात वाढली असली तरी लोकसंख्येच्या तुलनेत त्यांचे प्रमाण आजही कमीच आहे.त्यामुळे शिक्षणाच्या सुविधांच्या आभावाचा परिणाम सहाजिकच येथील सर्वांगीण विकासावर झालेला आहे.

**रत्नागिरी जिल्हयाची रूपरेषा –**

महाराष्ट्राच्या एकूण पाच प्रादेशीक व सहा प्रशासकीय विभागापैकी कोकण या प्रदेशीक तसेच प्रशासकीय विभागामध्ये रत्नागिरी या जिल्हयाचा समावेश होतो.हा जिल्हा महाराष्ट्राच्या पश्चिमेला अरबीसमुद्राच्या किनारपट्टीलगत वसलेला आहे. आता महाराष्ट्रातील कोकणात रत्नागिरी आणि सिंधुदुर्ग असे दोन स्वतंत्र जिल्हे आहेत परंतू पुर्वी या दोन्ही जिल्हयांच्या एकत्र भुप्रदेशाचा रत्नागिरी हा एकच जिल्हा होता.ज्यामध्ये राजापूर, लांजा, रत्नागिरी, संगमेश्वर, चिपळूण, गुहागर, दापोली, खेड, मंडणगड, सावंतवाडी, कुडाळ, वेंगुर्ला, मालवण, देवगड, कणकवली, अशा पुर्वीच्या १५ आणि त्यानंतर निर्माण झालेल्या वैभववाडी व दोडामार्ग या दोन अशा एकूण १७ तालुक्यांच्या विस्तीर्ण भुभागाचा समावेश होता.परंतू कालांतराने एवढया विस्तारीत भुभागावर प्रशासकीय नियंत्रण ठेवण्यामध्ये येत असलेल्या अडचणी व जनतेच्या तसेच प्रादेशिक, औद्योगीक, कृषी इत्यादी स्वरूपांच्या विकासावर येत असलेल्या मर्यादा यांचा विचार करून विरिस्तर्ण रत्नागिरी जिल्हयाचे ०१ मे १९८१ रोजी विभाजन करण्यात आले.या विभाजनातून सावंतवाडी, कुडाळ, वेंगुर्ला, मालवण,

देवगड, कणकवली, वैभववाडी आणि दोडामार्ग अशा ०८ तालुक्यांचा समवेश असलेल्या सिंधुदुर्ग या नव्या जिल्हयाची निर्मीती झाली. (https://sindhudurg.nic.in)

रत्नागिरी जिल्हयात राजापूर, लांजा, रत्नागिरी, संगमेश्वर, चिपळूण, गुहागर, दापोली, खेड अणि मंडणगड हे ०९ तालूके आहेत. १६.३० अंश ते १८.०४ अंश उत्तर अक्षांश आणि ७३.०२ अंश ते ७३.५३ अंश पुर्व रेखांश या पट्टयामध्ये येत असलेल्या सध्याच्या रत्नागिरी जिल्हयाच्या भुप्रदेशाची उत्तर-दक्षिण लांबी सुमारे १८० कि.मी.आणि पुर्व-पश्चिीम लांबी सुमारे ६४ कि.मी.इतकी असून जिल्हयाचे एकुण भौगेलीक क्षेत्र ८३२३ चौरस कि.मी इतके आहे. या जिल्हयाच्या पुर्वेला सातारा सांगली कोल्हापूर, दक्षिणेला सिंधुदुर्ग उत्तरेला रायगड हे जिल्हे तर पश्चिमेला अथांग पसरलेला अरबी समुद्र आहे. भुप्रदेशाच्या वैशिष्टयाबाबत विचार केल्यास रत्नागिरी जिल्हया पुर्वेच्या बाजूने पुर्णपणे सहयाद्री पर्वतांच्या डोंगर रांगांनी व्यापलेल्या असून पश्चिमेला पुर्णपणे १६७ कि.मी लांबीची अरबी समुद्राची किनारपट्टी लाभलेली आहे. जिल्हयाचा सुमारे ८५ टक्के भुभाग हा दुर्गम व डोंगराळ या प्रकारात मोडतो.त्यामुळे साहजीकच या प्रतिकुल भौगोलीक वैशिष्टयाचा या जिल्हयाच्या शैक्षणिकविकासावर प्रतिकुल परिणाम झालेला आहे. (https://sindhudurg.nic.in)

**रत्नागिरी जिल्हयातील शैक्षणीक स्थिती :**

रत्नागिरी जिल्हयातील जनतेच्या उपजिवीकेच्या साधनांचा विचार केल्यास असे लक्षात येते की, जिल्हयातील मुंबई - गोवा महामार्गावर वसलेल्या केवळ चिपळुण, खेड, रत्नागिरी या तालुक्यांच्या ठिकाणी काही प्रमाणात औद्योगीकरण झाले असल्यामुळे येथे अत्यंत अल्प प्रमाणातच स्थानीक तरूणांसाठी नोकरी व रोजगाराच्या संधी उपलब्ध आहेत.या तालुक्यांचा शहरीभागाचा अपवाद सोडला तर इतर तालूक्यांचा भाग आणि संपुर्ण ग्रामीण भागामध्ये मात्र नोकरी व रोजगाराच्या साधनांची तसेच उपजिवीकेच्या इतर साधनांची पुर्ण पणे कमतरता आहे.स्थानिक पातळीवर राहून नोकरी, रोजगार व व्यवसायाच्या संधी उपलब्ध होत नसल्यामुळे व त्यासाठी मुंबई पुण्यासारख्या शहारांकडे स्थलांतर होत असल्यामुळे येथे सहाजीकच काही प्रमाणातील प्राथमीक व माध्यमीक शिक्षणाच्या सुविधांव्यतीरिक्त शिक्षण व्यवस्थेचा फारसा विस्तार झाला नाही. तरूणवर्ग आपल्या १० वी १२ वी च्या शिक्षणानंतर प्रामुख्याने मुंबई व इतर शहरांमध्ये नोकरी रोजगारासाठी जातो हे आजही इथले वास्तव आहे.मुंबई पुणे यासारख्या मोठया शहरांमध्ये नोकरी रोजगार करून आपल्या गावाकडे राहात असलेल्या नातेवाईकांना पैसे पाठविणे ही येथील तरूणांची अपरिहार्यता अजूनही आहे.याचा थेट परीणाम येथील शैक्षणीक परिस्थितीवरही झालेला आहे. अशा या सर्व परिस्थतीमुळे कोकणातील रत्नागिरी जिल्हा हा अनेक बाबतीप्रमाणेच शिक्षणाच्या बाबतीतही मागास राहीला आहे.

**रत्नागिरी जिल्हा संख्यिकी अहवाल १९५८- ५९ यानुसार पुर्विच्या रत्नागिरी जिल्हयाची शैक्षणीक स्थिती टक्केवारीमध्ये**

| अ.नं. | तालुक्याचे नाव | साक्षरतेचे प्रमाण | | |
|---|---|---|---|---|
| | | पुरूष | महिला | एकुण |
| १ | मंडणगड | २०.९४ | ४.१० | ६.४९ |
| २ | दापोली | १४.४६ | ४.१२ | ९.३८ |
| ३ | खेड | २१.२३ | ५.८० | १३.९० |
| ४ | गुहागर | १९.५३ | ६.०५ | ११.७८ |
| ५ | चिपळूण | २०.९२ | ५.५३ | १२.४८ |
| ६ | संगमेश्वर | १७.१० | ५.९५ | १०.९७ |
| ७ | रत्नागिरी | २३.९५ | ८.०३ | १५.१७ |
| ८ | लांजा | १५.२३ | ३.५९ | ८.८४ |

| अ.नं. | तालुक्याचे नाव | साक्षरतेचे प्रमाण | | |
|---|---|---|---|---|
| | | पुरूष | महिला | एकुण |
| ९ | राजापुर | २१.९0 | ५.९७ | १२.९६ |
| १0 | देवगड | २८.३७ | ७.२८ | १६.६८ |
| ११ | कणकवली | २९.१२ | ६.३५ | १५.८५ |
| १२ | मालवण | ४६.७७ | १६.९४ | ३२.५३ |
| १३ | कुडाळ | ३४.४५ | ८.२५ | २0.३१ |
| १४ | वेंगुर्ला | ३६.७६ | १३.२0 | २३.८२ |
| १५ | सावंतवाडी | ३३.४३ | ६.५३ | १३.९८ |
| | **सरासरी** | **२४.४३** | **७.१७** | **१४.९२** |

रत्नागिरी जिल्हयातील ही शैक्षणीक परिस्थती सुधारण्याचे प्रयत्न अलीकडील काळात ज्यांनी केला त्यामध्ये श्री गोविंदराव निकम. डॉ. श्रीधर तथा तात्यासाहेब नातू यांची नावे प्राधान्य क्रमाने घ्यावी लागतील.कारण श्री गोविंदराव निकम यांनी स्थापन केलेल्या सहयाद्री शिक्षण संस्थेचा आज 0६ प्राथमिक शाळा, ३३ माध्यमीक विद्यालये, 0५ कनिष्ठ महाविद्यालये, १८ विविध शाखांची पदवी महाविद्यालये आणि मुला-मुलींसाठीची १४ वसतीगृहे इतका मोठा विस्तार झालेला आहे. त्यांच्याबरोबरच रत्नागिरी जिल्हयाच्या उत्तर भागातील विविध तालुक्यामध्ये शिक्षणाच्या प्रसाराचे काम डॉ. श्रीधर तथा तात्यासाहेब नातू यांनी केले.रत्नागिरी जिल्हयाच्या साक्षरतेचा आलेख वाढविण्यामध्ये जिल्हयाच्या परिसरातील या इतर मान्यवरांबरोबरच कै. डॉ. श्रीधर नातू यांचा मोलाचा वाटा आहे हे त्यांच्या खालील योगदानावरून स्पष्ट होते.जिल्हयाच्या शैक्षणीक मागासलेपणाचे हे चित्र बदलण्यासाठी कै.डॉ.श्रीधर तथा तात्यासाहेब नातू यांनी महत्वपुर्ण योगदान दिलेले आहे.

**डॉ.तात्यासाहेब नातूंचे शैक्षणीक कार्य -**

डॉ तात्यासहेब नातू यांनी मुंबईमधून वैद्यकीय शिक्षण पुर्ण केल्यावर घरच्या जेमतेम आर्थिक परिस्थितीमुळे स्वतंत्र वैद्यकीय व्यवसाय सुरू करण्याऐवजी १९५२ मध्ये महाराष्ट्र शासनाच्या वैद्यकीय खात्यात एस.एम. पी.सेंटर(प्राथमीक आरोग्य केंद्र) मध्ये नोकरी स्विकारली. रत्नागिरी जिल्हयातील चिपळूण तालुक्यातील मार्गताम्हाणे या गावामध्ये शासनाच्या आरोग्य खात्याचे प्राथमीक आरोग्य केंद्र मंजूर झाले होते.तेथे त्यांनी एम.एम.पी.सेंटर मध्ये त्यांनी वैद्यकीय सेवक या पदावर काम करण्यास सुरूवात केली. त्यावेळी रस्ते व प्रवासाची साधने याबाबतच्या सुविधा अत्यंत कमी प्रमाणात होत्या.सुरूवातीला पायी तसेच सायकलने व कालांतराने आपल्या जिप मधून प्रवास करून डॉ. नातू यांनी मार्गताम्हाणे एस.एम.पी.सेंटरच्या कक्षेतील गावांमधील लोकांना वैद्यकीय सुविधा पुरविण्याचे काम केले.पुढील काळात चिपळूण आणि गुहागर तालुक्याच्या सुमारे ४0 ते ५0 कि मी अंतरावरील गावांपर्यंत जाऊन लोकांना वैद्यकीय सेवा देण्याचे काम त्यांनी सुरू केले.याकाळात त्यांना येथील जनतेची शिक्षणाबाबतची गैरसोय लक्षात आली होती.या सर्व परिसराचा सर्वांगीण विकास करायचा असेल तर त्याची सुरूवात शैक्षणीक विकासापासून झाली पाहिजे असे ठरवून त्यांनी प्रवासाच्या दृष्टीने मध्यभागी व सोईस्कर असलेल्या विविध गावांमध्ये शिक्षण संस्थांची स्थापना केली.

डॉ.श्रीधर नातू यांनी ज्या शिक्षण संस्थेच्या स्थापनेपासून आपल्या शिक्षण प्रसाराची मुहुर्तमेढ रोवली ती 'रामपूर मार्गताम्हाणे एज्यूकेशन सोसायटी' ही शिक्षणसंस्था होय. डॉ.श्रीधर नातू आपला वैद्यकीय व्यवसाय ज्या मार्गताम्हाणे गावामध्ये करत होते त्या गावापासून जवळच असलेल्या गुहागर -चिपळूण रस्त्यावरील व चिपळूण तालुक्यातील रामपूर या गावामध्ये त्यांच्या पुढाकारातून १९६0 मध्ये ही पहिली शिक्षणसंस्था उभी

राहीली. रामपूरमध्ये ०१ ते ०७ वी पर्यंतच्या प्राथमीक शिक्षणाची सोय होती. त्यापुढील शिक्षणासाठी माध्यमिक शाळा सुरू करण्याचा प्रयत्न यापुर्वी झाला होता, पण तो अयशस्वी ठरला होता. वर्ग बसवीण्यासाठीच्या जागेचा व पटसंख्येचा आभाव असल्यामुळे वर्षभरात या वर्गाला मान्यता मिळू शकली नाही. यामुळे माध्यमिक शाळा सुरू करण्याचा हा प्रयत्न येथेच थांबला होता. डॉ नातू रूग्णांच्या तपासणीसाठी रामपूरला येत होते. त्यांचा श्री तुळशीराम चव्हाण यांच्याशी परिचय झाला होता व त्यांनी माध्यमिक शाळा सुरू करण्यासाठी केलेल्या प्रयत्नाची माहिती झाली होती. डॉ नातू यांना शिक्षणसंस्था स्थापन करणे अथवा चालविणे याबाबतचा अनुभव नव्हता परंतू त्यांनी श्री तुळशीराम चव्हाण यांना सोबत घेऊन माध्यमिक शाळा सुरू करण्याचे ठरविले. आणि येथुनच डॉ नातू यांच्या पुढाकारातून रामपूर येथे शिक्षणसंस्था स्थापन करण्याचे प्रयत्न सुरू झाले.

रामपूरचे रहीवासी परंतू मुंबईत रहात असलेले श्री रघुनाथ शांताराम चव्हाण यांच्या रामपूरच्या घरी आठवीचा वर्ग सुरू झाला. पुढे त्यांनी व त्यांचे बंधू श्री विश्वासराव शांताराम चव्हाण यांनी आपली १४ गुंठे जमीन शाळेच्या बांधकामासाठी विनामूल्य दिली. पुढील काळात इतरही काही दानशूर व्यक्तींनी शाळेसाठी जमीनी विनामूल्य दिल्या. डॉ श्रीधर नातू यांनी रामपूरच्या परिसरातील अनेक गावातून आपल्या वैद्यकीय सेवेच्या संपर्काच्या आधारे वर्गणीदार व देणगीदार सभासद जोडले. रूग्ण तपासणीची फी देऊ नका, त्याऐवजी संस्थेला देणगी द्या असा रूग्णांकडे आग्रह धरून व आपल्या जवळचे काही पैसे घालून बांधकाम निधी जमा केला. (*श्रीमती विजयाताई श्रीधर नातू यांची मुलाखत*) चिपळूण येथील कॉंग्रेसचे नेते व मंत्री श्री हुसेन दलवाई यांची भेट घेऊन त्यांचेही सहकार्य मिळविले आणि त्यांच्याच हस्ते नविन जागेमध्ये भुमीपूजन करून मे १९६० मध्ये दोन वर्गखोल्यांची इमारत बांधून पुर्ण केली व नविन जागेत शाळा सुरू झाली. पुढील काळात माध्यमिक व उच्च माध्यमिक शिक्षणासाठी एक सुसज्ज अशी इमारत उभारली. श्री हुसेन दलवाई यांच्या सहकार्यातून संस्थेला पुर्ण मान्यता व शासनाचे अनुदानही मिळविले.

या अनुभवातून पुढील काळात 'रामपूर मार्गताम्हाणे एज्यूकेशन सोसायटी' च्या अंतर्गत व इतर अशा १० गावांमध्ये माध्यमिक शाळा यशस्वीरीत्या सुरू केल्या. यामध्ये चिपळूण तालुक्यातील चिपळूण, रामपूर, भोम, वहाळ, कळमुंडी, ओंबळी, मार्गताम्हाणे या गावांमध्ये तसेच खेड तालुक्यातील गुणदे या गावामध्ये आणि गुहागर तालुक्यातील पाटपन्हाळे, तळवली या शाळांचा समावेश होतो. कालांतराने यातील काही शाळा त्या त्या गावातील सक्षम व जाणकार व्यक्तींच्या सहभागातून गावामध्ये स्वंतत्र शिक्षणसंस्था स्थापन करून त्यांच्याकडे चालविण्यास दिल्या. डॉ. श्री श्रीधर नातू. यांनी या सर्व संस्थांना त्यांच्या अडीअडचणीच्या काळात सर्वतोपरी मदत करून एका मार्गदर्शकाची भुमीका बजावली. विशेष म्हणजे यातील एकही शिक्षणसंस्था बंद पडली नाही त्या सर्व शिक्षणसंस्था आजही उत्तम रितीने कार्यरत आहेत.

**कै. डॉ. श्रीधर नातू यांनी स्थापन केलेल्या व स्थापनेमध्ये सहभागी असलेल्या शिक्षणसंस्था**

| अ.नं. | शैक्षणीक संस्थेचे नाव | स्थापना वर्ष |
|---|---|---|
| ०१ | रामपूर एज्यूकेशन सोसायटी, तालुका - चिपळूण | १९६० |
| ०२ | पाटपन्हाळे एज्यूकेशन सोसायटी, तालुका - गुहागर | १९६२ |
| ०३ | मार्गताम्हाणे एज्यूकेशन सोसायटी, तालुका - चिपळूण | १९६४ |
| ०४ | यशवंत शिक्षण संस्था भोम, तालुका - चिपळूण | १९६५ |
| ०५ | पंचक्रोशी शिक्षण प्रसारक मंडळ ओंबळी तालुका - चिपळूण | १९६५ |
| ०६ | नवकोकण एज्यूकेशन सोसायटी चिपळूण | १९६५ |
| ०७ | सरस्वती शिक्षण संस्था, गुणदे, तालुका - खेड | १९६७ |
| ०८ | परशूराम एज्यूकेशन सोसायटी चिपळूण | १९७५ |
| ०९ | दि पिपल्स एज्यूकेशन सोसायटी वहाळ तालुका - चिपळूण | १९८० |
| १० | श्री काळभैरव शिक्षण संस्था, कळमुंडी, तालुका - चिपळूण | १९८६ |
| ११ | कै. प्रेमजीभाई असर छात्रालय देवखेर्की. तालूका चिपळूण | १९९८ |


डॉ श्रीधर नातू यांनी वरील सर्व शिक्षणसंस्था स्थापना आपल्या प्रयत्नातून केल्या.यातील बहुतांशी शिक्षणसंस्थांमध्ये आज उच्च माध्यमीक महाविद्यालये तर पाटपन्हाळे एज्यूकेशन सोसायटी, तालुका - गुहागर, मार्गताम्हाणे एज्यूकेशन सोसायटी, तालुका - चिपळूण आणि नवकोकण एज्यूकेशन सोसायटी चिपळूण या तिनही संस्थामध्ये आज पदवी आणि पदव्यूत्तर (KG To PG) शिक्षणाच्या सुविधा उपलब्ध आहेत.या संस्था आजही येथील परिसरातील विद्यार्थ्यांसाठी एकमेव पदवी आणि पदव्यूत्तर शिक्षण घेण्यासाठीची साधने आहेत.यावरूनच डॉ श्रीधर नातू यांनी त्यांच्या काळात केलेल्या शैक्षणिक कार्याचे महत्व लक्षात येते.

**डॉ. श्रीधर तथा तात्यासाहेब नातू यांच्या पुढाकाराने सुरू झालेली माध्यमिक, उच्च माध्यमिक महाविद्यालये आणि पुढील काळात त्यातून सुरू झालेली पदवी व पदव्यूत्तर महाविद्यालये**

| माध्यमिक | उच्च माध्यमिक | महाविद्यालय |
|---|---|---|
| १.मिलींद हायस्कुल रामपूर | १.मोतीबाई एम ठाकरसी आर्टस ॲण्ड कॉमर्स कॉलेज रामपूर | -- |
| २.न्यू इंग्लीश स्कूल पाटपन्हाळे<br>३. इंग्लीश मिडीयम स्कूल पाटपन्हाळे<br>४. न्यू इंग्लीश स्कूल तळवली | २.ज्युनिअर कॉलेज पाटपन्हाळे<br>३.ज्युनिअर कॉलेज तळवली | १.पाटपन्हाळे कला वाणिज्य व विज्ञान महाविद्यालय (पदवी विभाग)<br>२.एम कॉम (पदव्यूत्तर विभाग) |
| ५.कै वसंतराव भागवत माध्यमिक विद्यालय मार्गताम्हाणे<br>६.मा ल भा हेदवकर विद्यानिकेतन हेदवी | ४.कै कमलाताई वामन पेठे कला वाणिज्य व विज्ञान कनिष्ठ महाविद्यालय मार्गताम्हाणे | ३.डॉ तात्यासाहेब नातू कला व वाणिज्य महाविद्यालय मार्ग ताम्हाणे |

| माध्यमिक | उच्च माध्यमिक | महाविद्यालय |
|---|---|---|
| ७.महादेवराव शिर्के माध्यमिक भोम | ५.व उच्च माध्यमिक महाविद्यालय भोम | -- |
| ८.युनायटेड माध्यमिक शाळा चिपळूण<br>९.गद्रे इंग्लीश मिडियम स्कूल<br>१0.न्यू इंग्लीश स्कूल गाणे खडपोली<br>११.मोरेश्वर आत्माराम आगवेकर माध्यमिक विद्यालय आलोरे<br><br>१२. न्यू इंग्लीश स्कूल पोफळी | ६. गद्रे ज्युनिअर कॉलेज<br>७.सी ए वसंतराव लाड कला वाणिज्य कनिष्ठ महाविद्यालय आलोरे<br><br>-- | -- |
| १३.कै शिवरामशेठ लांजेकर माध्यमिक विद्यालय कळमुंडी | -- | -- |
| १४.सदगुरू काडसिध्देश्वर महाराज विद्यालय गुणदे खेड | -- | -- |
| १५. न्यू इंग्लीश स्कूल व वहाळ | ८. कला वाणिज्य महाविद्यालय वहाळ | -- |
| १६. न्यू इंग्लीश स्कूल ओंबळी | -- | -- |
| १७. नवकोकण एज्यूकेशन सोसायटी चिपळूण. | ९. डी बी जे कनिष्ठ महाविद्यालय चिपळूण<br>(कला वाणिज्य व विज्ञान) | ४.डी बी जे वरिष्ठ महाविद्यालय चिपळूण<br>(कला वाणिज्य व विज्ञान)<br>५.एम ए<br>(पदव्यूत्तर विभाग) |

जिल्हा सामाजिक व आर्थिक समालोचन २०१८ जिल्हा रत्नागिरी यामधील माहितीनुसार डॉ श्रीधर नातू यांचे कार्यक्षेत्र असलेल्या चिपळूण व गुहागर या तालुक्यांच्या परिसरात एकूण ३३0 माध्यमिक शाळा, ६१ उच्च माध्यमिक महाविद्यालये आणि 0५ पदवी महाविद्यालये आहेत.त्यांपैकी डॉ नातू यांच्या पुढाकारातून आणि पुढील काळात त्यांच्या कार्यातून घेतलेल्या प्रेरणेतून १६ माध्यमिक शाळा, 0९ उच्च माध्यमिक महाविद्यालये आणि 0५ पदवी महाविद्यालये सुरू झाली आहेत.आज ही सर्व ज्ञानदानची मंदीरे या दुर्गम व डोंगराळ भागातील सर्वसामान्य जनतेला शिक्षणाचा लाभ देत आहेत.




वरील आलेखावरून असे स्पष्ट होते की, डॉ श्रीधर नातू यांच्या कार्यक्षेत्रातील एकूण माध्यमिक विद्यालयांची संख्या ८२ इतकी असून त्यापैकी डॉ श्रीधर नातू यांच्या पुढाकाराने १६ माध्यमिक विद्यालये सुरू झाली आहेत. म्हणजे एकूण माध्यमिक विद्यालयांपैकी १९.५२ टक्के माध्यमिक विद्यालयांची स्थापना त्यांनी केली आहे. त्याचप्रमाणे त्यांच्या कार्यक्षेत्रातील एकूण उच्च माध्यमिक विद्यालयांची संख्या १५ इतकी असून त्यापैकी ०९ उच्च माध्यमिक विद्यालये त्यांनी स्थापन केलेल्या शैक्षणीक संस्थामध्ये सुरू आहेत. म्हणजेच त्यांच्या योगदानाने सुरू झालेल्या उच्च माध्यमिक विद्यालयांची टक्केवारी ६० टक्के इतकी आहे. तर आज त्यांच्या कार्यक्षेत्रामध्ये ०७ पदवी व पदव्यूत्तर महाविद्यालये कार्यरत असून यापैकी ०५ डॉ श्रीधर नातू यांनी स्थापन केलेल्या संस्थांमध्ये कार्यरत आहेत. म्हणजे म्हणजेच त्यांच्या योगदानाने सुरू झालेल्या पदवी व पदव्यूत्तर महाविद्यालयांची टक्केवारी ७१ टक्के इतकी आहे.

**<u>जनगणना १९६१ ते २०११ नुसार रत्नागिरी जिल्हयातील साक्षरतेचे प्रमाण</u>**

| अ.न. | जनगणना कालावधी | साक्षरता प्रमाण | | |
|---|---|---|---|---|
| | | पुरूष | महिला | एकुण |
| ०१ | जनगणना १९६१ | ३७.४८ | ११.८३ | २३.१६ |
| ०२ | जनगणना १९७१ | ४८.२३ | २६.१९ | ३५.८९ |
| ०३ | जनगणना १९८१ | ५५.६५ | ३४.६६ | ४३.८७ |
| ०४ | जनगणना १९९१ | ७६.६४ | ५१.६१ | ६२.७० |
| ०५ | जनगणना २००१ | ८५.८९ | ६५.७७ | ७५.०५ |
| ०६ | जनगणना २०११ | ९०.९३ | ७४.५३ | ८२.१८ |

संदर्भ - जिल्हा सामाजिक व आर्थिक समालोचन २०१७, जिल्हा रत्नागिरी

वरील तक्त्यामध्ये दिलेल्या साक्षरतेबाबत दिलेल्या आकडेवारीवरून रत्नागिरी जिल्हयातील जनतेचे जनगणना कालावधी १९५१ मध्ये साक्षरतेचे प्रमाण १४.९२ टक्के इतके होते. त्यामध्ये सतत वाढ होऊन ते जनगणना कालावधी २०११ मध्ये ८२.१८ इतके झाले आहे.

**निष्कर्ष -**

रत्नागिरी जिल्हयाच्या या शैक्षणीक प्रगतीच्या वाटचालीमध्ये भारत सरकार आणि महाराष्ट्र सरकारने ग्रामीण भागाच्या शैक्षणीक विकासासाठी राबविलेल्या योजनांचा व यासंबधीच्या विविध उपक्रमांचा वाटा आहेच. परंतू ही एवढीच बाब पुरेशी नसते तर त्याला प्रचंड मानवी ईच्छाशक्तीची जोडही असावी लागते. आपल्या भागाचा व तेथील जनतेचा सर्वांगीण विकास व्हावा या ध्येयाने प्रेरीत होऊन तन, मन, धन अर्पण करून त्यासाठी झटणा-या समाजसेवकांचे, नेत्यांचे यामध्ये फार मोठे योगदान असावे लागते. रत्नागिरी जिल्हयाच्या या शैक्षणीक प्रगतीमध्येही अशाच विविध दुर्दम्य मानवीशक्तींचा व व्यक्तींचा फार मोठा वाटा आहे. त्यापैकी एक कै. डॉ. श्रीधर नातू होते. त्यांनी आपल्या संपूर्ण जिवनामध्ये जात- पात, धर्म, पक्ष, लहान-थोर असा कोणताच भेद न करता जनतेचे जिवमान उंचावले पाहिजे या उदात्त ध्येयाने विकासाची अनेक कामे निस्वार्थपणे केलेली आहेत. त्यापैकीच त्यांनी केलेले शैक्षणीक विकासाचे कार्य हे एक आहे.

डॉ. श्रीधर नातू यांचे राजकीय कार्यक्षेत्र असलेल्या रत्नागिरी जिल्हयामध्ये व त्यातील गुहागर, चिपळूण, खेड, संगमेश्वर, दापोली या तालूक्यांच्या शहरी व प्रमुख्याने सर्वदूर ग्रामीण भागात आपल्या श्रमातून व अर्थिक योगदानातून १९६० पासून पुढील काळात खालील शैक्षणीक संस्थांची स्थापना केली तर काही शैक्षणीक संस्थांच्या स्थापनेमध्ये सहभाग घेतला. या सर्वच शैक्षणीक संस्थांचे आज ज्ञानदानाच्या वटवृक्षांमध्ये रूपांतर झाले आहे. त्यामुळे १९६० च्या दशकापासून पुढील काळात रत्नागिरी जिल्हयाच्या सक्षरतेच्या प्रमाणात आणि शिक्षणाच्या प्रसारात जी झपाटयाने प्रगती झाली आहे त्यामध्ये त्यांचे मोलाचे योगदान आहे असेच म्हणावे लागेल.

**संदर्भ सूची -**

रत्नागिरी जिल्हा संख्यिकी अहवाल १९५८- ५९
जिल्हा सामाजिक व आर्थिक समालोचन २०१७, जिल्हा रत्नागिरी
जिल्हा सामाजिक व आर्थिक समालोचन २०१८ जिल्हा रत्नागिरी (तक्ता क्र. ८.१, ८.२ व ८.३ आणि पान नं ७६, ७८ व ८०) संदर्भ वर्ष २०१७ - १८
संपादक अण्णा शिरगावकर. 'दयाघन' - आमदार डॉ तात्यासाहेब नातू स्मृतिग्रंथ. प्रकाश लिमये प्रिंटर्स हाऊस सदाशिव पेठ, पुणे ३० पान नं ०९
श्री द. ना. दिक्षीत. 'अलैकीक श्रीधर'. श्री जे प्रिंटर्स १४१६ सदाशिव पेठ पुणे. फेब्रुवारी १९९८ पान नं. १
माजी आमदार डॉ विवेक नातू यांच्या कार्यालयातील डॉ श्रीधर नातू यांच्या विधानसभेतील कामकाजाच्या संदर्भातील जतन करून ठेवलेली कागदपत्रे.
श्रीमती विजयाताई श्रीधर नातू यांची मुलाखत
दैनिक लोकमत रविवार दिनांक १६ जानेवारी २०२२ पुरवणी लेख - कोकणचे कर्मयोगी स्व. गोविंदराव निकम लेखक
प्रा प्रविणवाघचौरे. दैनिक प्रहार शुक्रवार १८ मार्च २०११ लेख शिक्षण व सहकारातील दिपस्थंभ लेखक श्री विनोद फणसे.
http://mr.m.wikipedia.org
https://sindhudurg.nic.in
Source – Ratnagiri District Census Hand Book (1951)
Statement showing Literacy by Taluka/ Mahal of Ratnagiri District 1951 census.